The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# विनोबा भावे : शब्दशक्तीचे आधुनिक उपासक

**डॉ. नागेश विनायक अंकुश,**
(भाषा अभ्यासक) सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर,

विनायक नरहर भावे 1895 ते 1982 असा कालखंड लाभलेले विनोबा भूदान चळवळीचे प्रणेते, स्वातंत्र्य सैनिक, पहिले सत्याग्रही, सर्वोदय नेते, अध्यात्माची उच्च साधना असलेले साधक, वैचारिक उंची लाभलेले विचारवंत, जगातल्या विविध भाषा जाणणारे भाषाप्रभू असे बहुविध पैलू लाभलेले विनोबा एक प्रभावी असे आधुनिक संत होते.1983 मध्ये विनोबांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गीतेवर भाष्य कसे करावे, कर्मयोग केंद्रस्थानी ठेवून प्रवचने कशी द्यावीत याचा वस्तुपाठ पूज्य विनोबांनी घालून दिला. विनोबा म्हणत 'वर्तनाला बंधन असले की वृत्ती मोकळी राहते'. (विचारपोथी)

विनोबा भावे म्हणत, "कोणत्याही कामाची तीन आवश्यक अंगे आहेत. काम जाणून केले पाहिजे, वेगाने केले पाहिजे, नेटके केले पाहिजे. हे तिन्ही गुण साधले म्हणजे काम साधले.

उदाहरणार्थ, लिहिणे केव्हा आले म्हणावयाचे? जलद धावत्या हाताने लिहिता आले पाहिजे, 'वाटोळे सरळ मोकळे' असे सुंदर लिहिता आले पाहिजे आणि शुद्धलेखनाच्या नियमांबरहुकुम शुद्ध लिहिता आले पाहिजे. इतके झाले म्हणजे लिहिणे आले. शीघ्र लेखन हे लेखनातले 'कर्म', सुंदरता ही 'भक्ती' आणि शुद्ध लेखन हे 'ज्ञान', असेही गीतेच्या भाषेत म्हणता येईल. ह्या तिहींचा योग साधणे हीच काम करण्याची हातोटी किंवा खुबी. 'योगः कर्मसु कौशलम्"[1]

विनोबा मराठी भाषेबद्दल किती सजग, जागरूक होते हे सहजपणे लक्षात येते. लेखन आणि भगवद्गीता या दोन्हींची किती परिणामकारकाने अनोखी सांगड घातली विनोबांनी. साहित्याकडे पाहण्याचा विनोबांचा स्वतंत्र दृष्टिकोन .

विनोबांचे साहित्य- विचार प्रचलित साहित्यापेक्षा वेगळे आहेत. ते जसे विश्वसाहित्याचे एक चांगले अभ्यासक होते, तसे ते एक उत्तम भाषाप्रभू-भाषातज्ज्ञ होते. विनोबा म्हणत, "समाजाला तीन शक्तींमधून वळण देण्यासाठी विशेष मदत मिळते. त्यात साहित्य-शक्ती ही त्या तीनपैकीच एक आहे. या शक्तीमुळे मानव हृदयावर खूप मोठा आणि सखोल संस्कार होतो. म्हणून आपण साहित्याची शक्ती ओळखली पाहिजे, शब्दशक्तीची उपासना केली नाही तर आपण हार खाऊ."(साहित्य- विचार )

विनोबा किती चपखलपणाने साहित्याचे महत्त्व अधोरेखित करतात. साहित्याचे मोल समजवतात. शब्दाची महती सांगतात. लिखित भाषेचे मोल सूचित करतात.

विनोबा लिहितात, "योग्य शब्दांच्या अभावी प्रकाशाऐवजी अप्रकाश व्हायचा, प्रत्येक शब्दासंबंधी विवेक करावा लागतो. आपल्या शब्दाने न्यून भाव प्रकट होऊ नये, अतिरिक्त भाव प्रकट होऊ नये आणि विपरीत भावही प्रकट होऊ नये, अशी काळजी घ्यावी लागते." ."(साहित्य- विचार ) या विचारातून विनोबा शब्दांचे अचूक भान देतात. साहित्यिकांना लोकहृदयाला अनुकूल असे परिपूर्ण शब्द प्रकट करण्याची कुशलता साधली पाहिजे. अशी रास्त अपेक्षाही व्यक्त करतात.

विनोबांनी लिहिलेल्या - 1947 अगोदरच्या निवडक लेखांचा आणि भाषणांचा संग्रह असलेल्या 'जीवनाचा उलगडा' या पुस्तकात विनोबांच्या भाषा - विचाराच्या आणि साहित्य - विचाराच्या अनुषंगाने 'वाणीचा सदुपयोग,' व 'साहित्याची दिशाभूल' हे दोन लेख अतिशय महत्त्वपूर्ण आहेत.

'वाणीचा सदुपयोग' या उपशीर्षकातील लेखात ते लिहितात की," पतंजलीची अशी कहाणी सांगतात की त्याने चित्त -शुद्धीसाठी योग -सूत्रे लिहिली, शरीर-शुद्धीसाठी वैद्यक लिहिले, आणि वाक्-शुद्धीसाठी व्याकरण- महाभाष्य लिहिले. वाणीची शुद्धी हे व्याकरणाचे उद्दिष्ट मानले गेले आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे."[3]

पुढे विनोबा या लेखाचा शेवट करताना उद्बोधक असे निरीक्षण नोंदवताना ते लिहितात की," लेखनाची आणि भाषणाची साधने आज सुलभतम झाली आहेत, पण म्हणूनच की काय सभ्यवाणी दुर्लभ झाली आहे सभ्यवाणी गमावून सुलभ साधने कमावणे म्हणजे कवीच्या भाषेत नेत्र विकून चित्र खरीदण्यासारखे आहे. सुलभतम साधने संपादन करणे, एवढाच मानवाचा महिमा नाही सुलभतम साधन संपादून त्याचा कुशलतम उपयोग करणे यात मानवाची महत्ता आहे.'[4] विनोबांचे विविध भाषांवर जसे उत्तम प्रभुत्व होते, तसे मातृभाषा मराठीवर ते विशेष / विलक्षण होते. त्यांनी अनेक मराठी आणि संस्कृत शब्द पुनर्जीवित केले. ते वापरात आणले आणि प्रचलितही केले. अशा सगळ्या शब्दांचा नेमका उपयोग त्यांच्या समग्र साहित्यात केलेला दिसून येतो . दोन शब्दांना जोडण्यासाठी ते संयोगचिन्हांचा अतिशय सुरेख अनुरूप उपयोग करतात . (उदाहरणार्थ दिशा-दर्शक, समाज-शास्त्र, शेती-प्रधान इत्यादी.)

विनोबांविषयी राम शेवाळकर लिहितात," विनोबा हे आधुनिक युगातील एक थोर ऋषी आहेत. त्यांना केवळ ज्ञानवंत, विचारवंत व चिंतक मानणे पुरेसे नाही."[5]

संदर्भ -

1.विनोबा भावे, शिक्षण :तत्त्व आणि व्यवहार, आवृत्ती 2015, परंधाम प्रकाशन, पवनार, पृष्ठ 71.
2.साहित्य- विचार
**3.** विनोबा भावे, , वाणीचा सदुपयोग (लेख) , जीवनाचा उलगडा, परंधाम प्रकाशन, पवनार. आवृत्ती दुसरी, फेब्रुवारी 2019. 26-27, 4 .तत्रैव 26 5.उनि 05

**विनोबा भावे : शब्दशक्तीचे आधुनिक उपासक**

**डॉ. नागेश विनायक अंकुश,**